**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**

**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**

**सभावृत्तांत**

**कार्यपत्रिका क्र. ९**

दिनांक :- २१/११/२०१३ वेळ :- दु. १२.१५ वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा गुरुवार दिनांक २१/११/२०१३ रोजी दु. १२.१५ वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. पवार यमुनाताई रमणनाना | अध्यक्षा |
| २. | मा. तरस बाळासाहेब जयवंत | सदस्य |
| ३. | मा. भोंडवे संगिता राजेंद्र | सदस्य |
| ४. | मा. भोंडवे मोरेश्वर महादू | सदस्य |
| ५. | मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव | सदस्य |
| ६. | मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर | सदस्य |
| ७. | मा. लोंढे गणेश नारायण | सदस्य |
| ८. | मा. शमीम पठाण | सदस्य |
| ९. | मा. अँड.चिंचवडे संदिप गुलाबराव | सदस्य |
| १०. | मा. चिंचवडेपाटील आश्विनी गजानन | सदस्य |
| ११. | मा. को-हाळे अनंत सुभाष | सदस्य |
| १२. | मा. शिंदे शितल उर्फ विजय गोरख | सदस्य |
| १३. | मा. शेट्टी प्रसाद | सदस्य |
| १४. | मा. साळुंके सविता सुरेश | सदस्य |
| १५. | मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन | सदस्य |
| १६ | मा. मासुळकर समीर मोरेश्वर | सदस्य |
| १७. | मा. पालांडे सुजाता सुनिल | सदस्य |
| १८. | मा. कदम सदगुरु महादेव | सदस्य |
| १९. | मा. मंचरकर गिता सुशिल | सदस्य |
| २०. | मा. कदम कैलास महादेव | सदस्य |
| २१. | मा. साबळे छाया जगन्नाथ | सदस्य |
| २२. | मा. ओव्हाळ शेखर अशोक | सदस्य |

तसेच खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा. प्रभाग अधिकारी सुभाष माछरे, मा. कार्य. अभियंता रविंद्र दुधेकर, गोपाळराव चिंचवडे, वसंत काची, प्रशासन अधिकारी - शांताराम राऊत, लेखाधिकारी - सुरेश आव्हाळे, उपअभियंता - डी. एन. गट्टूवार – ड्रेनेज, सी.बी. कोंडे, के. डी. फुटाणे, व्हि. जी कांबळे – स्थापत्य, संजय घुबे,

व्ही.एन.देसले, श्रीम. मोमीन - पा.पु., ए.एस. शेख, आर. एस. बटुळे, एस. पी. जाधव – विद्युत, आर.बी. चांदेरे, बी. के. बैचे – उद्यान, सहा. आरोग्याधिकारी, जे.एस. जानकर, जी.एस. देशपांडे इत्यादी.

सर्वप्रथम मा. अध्यक्ष मा. पवार यमुनाताई रमणनाना यांनी उपस्थितांचे स्वागत केले. व सभेचे कामकाजास सुरुवात झाली

प्रशासन अधिकारी (सभाशाखा) ब प्रभाग समिती यांनी विषयपत्राचे वाचन केले.

सन २०१४-१५ चे अंदाज पत्रकात नागरिकांचा सहभाग अंतर्गत पाणी पुरवठा विभागाकडे २, स्थापत्य विभागाकडे ३३ व विद्युत विभागाकडे ३ अर्ज प्राप्त झालेले आहेत. सदर अर्जांचे वाचन करुन त्यावर चर्चा करण्यात आली. तसेच याबाबत कार्यवाही चालू असल्याचे संबंधित कार्यकारी अभियंता यांनी सांगितले.

**उपस्थित सन्मा सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय**

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र. ५. भिंत व मुतारी बांधणेबाबत, कार्यवाहीबाबत.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयामागे मनपाची भिंत अर्धवट असुन ती तोडलेली आहे. ज्यांनी ती भिंत तोडलेली आहे त्यांच्यावर कार्यवाही करावी. तसेच अर्धवट असलेली भिंत पुर्ण मैदानाला बांधणेत यावी व पुर्वीची जी मुतारी होती ती त्याच ठिकाणी बांधणेत यावी.

विषय क्र. ६. प्रभाग क्र.२८ मासुळकर कॉलनी येथे आरक्षण क्र.७७ व आरक्षण क्र. ७९ बेघरांसाठी घरे यासाठी आरक्षित आहे. सदर जागा मनपाच्या ताब्यात आहे व त्या ठिकाणी बाहेरील लोक स्वत:च्या उपयोगासाठी वापर करतात तसेच त्या ठिकाणी स्क्रॅप माल टाकतात. त्यामुळे तेथे दुर्गंधी निर्माण झाली आहे. तरी कृपया आपल्या ताब्यात असलेल्या जागेवर आपण ताबा फलक लावावा. व तसेच बाहेरील लोक अतिक्रमण करु नये म्हणून आपण त्यास तारेचे कुंपण लवकरात लवकर लावणे.

विषय क्र. ७. प्रभाग क्र.२८ मासुळकर कॉलनी येथे सिध्दार्थ संघाची गेले १५ वर्षापूर्वी स्थापना झाली आहे. त्या संघासाठी समाज मंदिराची उभारणी सामाजिक कामासाठी करावी म्हणून सतत मागणी होत आहे. आपल्या प्रभागात आरक्षित जागेत सदर समाज मंदिर बांधण्यात उभारण्यात यावे हि विनंती. सदर समाज मंदिराचा ठराव २००७ साली आपल्या प्रभागात एकदा करण्यात आला होता. परंतू अजूनही त्या कामाला चालणा न मिळाल्याने सदर विषय मंजूर व्हावा.

विषय क्र. ८. प्रभाग क्र.१८ किवळे येथील विविध चौकास व रस्त्याना नांवे देण्याबाबत

- भिमाशंकरनगर मधील पाचही रस्त्यांना भिमाशंकरनगर कॉलनी नं.१ ते ५ असे पाच फलक त्या ठिकाणी लावण्यात यावे.
- किवळे गावठाणमधील गावठाण ते बापदेव मंदिर हया रस्त्यास श्री बापदेव महाराज पालखी मार्ग तसेच मंदिरासमोर ग्रामदैवत श्री बापदेव महाराज देवस्थान किवळे असा नामफलक लावण्यात यावा.

- विकासनगरमधील पुर्वीचा आसाराम बापू चौक हा फलक काढून त्या ठिकाणी जगतगुरु श्री. संत तुकाराम महाराज चौक असा नामफलक लावण्यात यावा.
- एक्सप्रेस हायवे उड्डाणपुला नजीकच्या चौकास ग्रामदैवत श्री बापदेव महाराज चौक असा फलक लावावा.
- किवळे प्रभागातील १. श्री बापदेवनगर, २. श्रीनगर, ३.उत्तमनगर, ४. कोतवालनगर, ५. भारतरत्न हौ. सोसायटी, ६. स्वर्गीय भिमराव रामभाऊ तरस नगर (MB camp ऐवजी ) असे नामफलक विविध नगरांना लावण्यात यावे.

ठराव क्र. ६५ विषय क्र. १
दि. २१/११/२०१३ विभाग :स्थापत्य विभाग ब प्रभाग
सुचक : मा. शमीम पठाण अनुमोदक : मा. भोईर भाऊसाहेब
सोपानराव संदर्भ : क्र.बप्र/स्था/२/कावि/११३/२०१३, दि.१३/११/२०१३ चे पत्र.
मा. प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे

ब प्रभाग कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र.२१ (प्रभागाचे नाव- दळवीनगर) चा समावेश होतो सदर प्रभागा मध्ये म.न.पा.चे स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यान विकसीत झालेले आहे. सदर उद्यानामध्ये या पूर्वी म.न.पा. कडून झुकझुक गाडी साठी तिकीटघर बांधणेत आले आहे. तिकीटघराचा आकार ३.१५ मी. X ५.१० मी. एवढा आहे. सदर तिकीटघरास ब-याच प्रमाणात तडे निर्माण झाले असून मोडकळीस आले आहे. उद्याना मध्ये तिकीटघरा भोवताली नागरीक ये-जा करीत असतात. त्यामुळे भविष्यात होणारी जिवीतहानी तसेच वित्तहानी टाळण्यासाठी सदरचे तिकीटघर हटविण्यात यावे असे या विभागाचे मत आहे. सदरचे प्रस्तावास मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ६६ विषय क्र. २
दि. २१/११/२०१३ विभाग :स्थापत्य विभाग ब प्रभाग
सुचक : मा. शिंदे शितल उर्फ विजय गोरख अनुमोदक : मा. चिंचवडेपाटील आश्विनी
गजानन संदर्भ : क्र.बप्र/स्था/२/कावि/११४/२०१३, दि.१३/११/२०१३ चे पत्र.
मा. प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे

ब प्रभाग कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र.२४ (प्रभागाचे नाव – प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह) चा समावेश होतो. सदर प्रभागामध्ये कै.भागुजी गोलांडे आणि श्रीधरनगर उद्यान म.न.पा कडुन विकसित झाले आहे. सदर उद्यानामध्ये नागरिकांच्या वापरासाठी मुतारी आहे. सदरची मुतारी उद्यानाच्या बागेत आहे परंतु वापर बाहेरील बाजुने होत आहे. मुतारी दर्शनी बाजुने तसेच आतमध्ये सुस्थितीत आहे. परंतु उद्यानाच्या मागील बाजुस वडाचे मोठे झाड आहे .सदर झाडाची मुळे बांधकामाच्या पायथ्याशी गेल्याने मुतारीच्या मागील भाग धोकादायक झालेला आहे. तसेच मागील बाजूस भिंतीमध्ये झाडे उगवल्याने भिंतीना तडे पडले आहेत. सदर मुतारीचा आकार ३.४५ मी. x २.०० मी. एवढा आहे. त्यामुळे सदरची मुतारीचे पक्के बांधकाम हटवुन फायबर मुतारी ठेवणे योग्य होणार आहे.

तसेच श्रीधरनगर उद्यानात वॉचमन क्वार्टर शेजारी उद्यान विभागाचे ऑफिस आणि गोडाऊन आहे. सदरचे ऑफिस तसेच गोडाऊन जुने कौलारु स्वरुपाचे असुन भिंत ०.१०

मी.जाडीची सिपोरेक्स पध्दतीची आहे. सदर खोलीचे छत पावसाळयात लिकेज होत असले बाबत उद्यानामधील कर्मचा-याचे म्हणणे आहे . सदर खोलीवर लोखंडी Truss घेवुन पत्रे टाकणे धोकादायक होणार आहे. त्यामुळे वॉचमन क्वार्टर शेजारील ऑफिस आणि गोडाऊन हटविणे आवश्यक आहे असे ह्या विभागाचे मत आहे. सदर ऑफिस आणि गोडाऊन याचा आकार ५.९०मी. X ३.६०मी. एवढा आहे.

तरी प्रभाग क्र.२४ मधील कै.भागुजी गोलांडे उद्यानातील मुतारी तसेच श्रीधरनगर उद्यानातील वॉचमन क्वार्टर शेजारील ऑफिसची आणि गोडाउनची खोली हटविणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ६७ विषय क्र. ३

दि. २१/११/२०१३ विभाग : विद्युत विभाग ब प्रभाग

सुचक : मा. शिंदे शितल उर्फ विजय गोरख अनुमोदक : मा. चिंचवडेपाटील आश्विनी गजानन

संदर्भ : क्र.बप्र/वि/3/कावि/२३९/२०१३, दि.१३/११/२०१३ चे पत्र.

मा. प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे

ब प्रभागातील मनपा भवन उप विभागातील विविध परिसरातील विविध कार्यक्रमांसाठी वार्षिक पध्दतीने तात्पुरती ध्वनिक्षेपण, प्रकाश व जनरेटरची व्यवस्था करणेस रक्कम रुपये ९९९९९०/- अक्षरी रक्कम रुपये नऊ लाख नव्याणव हजार नऊशे नव्वद रुपये फक्त चे पुर्वगणनपत्रकास व त्या प्रमाणे काम करण्यास मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ६८ विषय क्र. ४

दि. २१/११/२०१३ विभाग :स्थापत्य विभाग ब प्रभाग

सुचक : मा. शिंदे शितल उर्फ विजय गोरख अनुमोदक : मा. शेट्टी प्रसाद

संदर्भ : क्र.बप्र/स्था/२/कावि/११५/२०१३, दि.१३/११/२०१३ चे पत्र.

मा. प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे

पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत ब प्रभाग कार्यालय क्षेत्राचा समावेश होतो. सदर प्रभागामध्ये प्रभाग क्र. २४ (प्रभागाचे नावः- प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह ) चा समावेश होतो. सदर प्रभागामध्ये काळेवाडी फाटा ते देहुआळंदी रस्त्यापर्यंतचा बी. आर. टी.एस.कॉरीडॉर JNNURM अंतर्गत विकसीत करण्याचे काम म.न.पा कडील बी. आर. टी.एस. विभागा कडुन घेणेत आले आहे. त्या मध्ये पवना नदी ते मुंबई-पुणे लोहमार्ग व महामार्ग ओलांडण्यासाठी उड्डानपुल बांधणेचे काम चालु आहे. सदर उड्डानपुल कामामध्ये चिंचवड लिंकरोड येथे यशोपुरम् सोसायटी समोर म.न.पा चे दोन फायबर चे वाचनालय आहे.सदरचे वाचनालय रस्त्यामध्ये पुलाचे कामासाठी बाधीत होत असले बाबत बी. आर. टी.एस. विभागाने क्र.स्था/ बी. आर. टी.एस./२८४/२०१३, दि.०९/१०/२०१३ अन्वये कळविले आहे. तरी पुलाचे कामासाठी बाधित होणारे वाचनालय काढणे आवश्यक आहे. सदरचे प्रस्तावास मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ६९ विषय क्र. ५
दि. २१/११/२०१३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय
सुचक : मा. कदम कैलास महादेव अनुमोदक: मा. मंचरकर गिता सुशिल
संदर्भ : मा. कदम कैलास महादेव यांचे दि. २१/११/२०१३ रोजीचे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

भिंत व मुतारी बांधणेबाबत, कार्यवाहीबाबत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयामागे मनपाची भिंत अर्धवट असुन ती तोडलेली आहे. ज्यांनी ती भिंत तोडलेली आहे त्यांच्यावर कार्यवाही करावी. तसेच अर्धवट असलेली भिंत पुर्ण मैदानाला बांधणेस व पुर्वीची जी मुतारी होती ती त्याच ठिकाणी बांधणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ७० विषय क्र. ६
दि. २१/११/२०१३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय
सुचक : मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन अनुमोदक : मा. मासुळकर समीर मोरेश्वर
संदर्भ : मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन यांचे दि. २१/११/२०१३ रोजीचे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

मासुळकर कॉलनी येथे आरक्षण क्र.७७ व आरक्षण क्र. ७९ बेघरांसाठी घरे यासाठी आरक्षित आहे. सदर जागा मनपाच्या ताब्यात आहे व त्या ठिकाणी बाहेरील लोक स्वत:च्या उपयोगासाठी वापर करतात तसेच त्या ठिकाणी स्क्रॅप माल टाकतात. त्यामुळे तेथे दुर्गंधी निर्माण झाली आहे. तरी कृपया आपल्या ताब्यात असलेल्या जागेवर आपण ताबा फलक लावावा. व तसेच बाहेरील लोक अतिक्रमण करु नये म्हणून त्यास तारेचे कुंपण लवकरात लवकर लावणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ७१ विषय क्र. ७
दि. २१/११/२०१३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय
सुचक : मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन अनुमोदक : मा. साळुंके सविता सुरेश
संदर्भ : मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन यांचे दि. २१/११/२०१३ रोजीचे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

मासुळकर कॉलनी येथे सिध्दार्थ संघाची गेले १५ वर्षापूर्वी स्थापना झाली आहे. त्या संघासाठी समाज मंदिराची उभारणी सामाजिक कामासाठी करावी म्हणून सतत मागणी होत आहे. आपल्या प्रभागात आरक्षित जागेत सदर समाज मंदिर बांधण्यात उभारण्यात यावे हि विनंती. सदर समाज मंदिराचा ठराव २००७ साली आपल्या प्रभागात एकदा करण्यात आला होता. परंतू अजूनही त्या कामाला चालणा नाही. समाज मंदिर बांधण्यास मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ७२ विषय क्र. ८
दि. २१/११/२०१३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय
सुचक : मा. तरस बाळासाहेब जयवंत अनुमोदक : मा. मासुळकर समीर मोरेश्वर
संदर्भ : मा. तरस बाळासाहेब जयवंत यांचे दि. २१/११/२०१३ रोजीचे पत्र.
मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.
किवळे येथील विविध चौकास व रस्त्याना नांवे देण्याबाबत

- भिमाशंकरनगर मधील पाचही रस्त्यांना "भिमाशंकरनगर कॉलनी नं.१ ते ५" असे पाच फलक त्या ठिकाणी लावण्यात यावे.
- किवळे गावठाणमधील गावठाण ते बापदेव मंदिर हया रस्त्यास " श्री बापदेव महाराज पालखी मार्ग" तसेच मंदिरासमोर ग्रामदैवत "श्री बापदेव महाराज देवस्थान किवळे" असा नामफलक लावण्यात यावा.
- विकासनगरमधील पुर्वीचा आसाराम बापू चौक हा फलक काढून त्या ठिकाणी "जगतगुरु श्री. संत तुकाराम महाराज चौक" असा नामफलक लावण्यात यावा.
- एक्सप्रेस हायवे उड्डाणपुला नजीकच्या चौकास ग्रामदैवत "श्री बापदेव महाराज चौक" असा फलक लावावा.
- किवळे प्रभागातील १. श्री बापदेवनगर, २. श्रीनगर, ३.उत्तमनगर, ४. कोतवालनगर, ५. भारतरत्न हौ. सोसायटी, ६. स्वर्गीय भिमराव रामभाऊ तरस नगर (MB camp ऐवजी ) असे नामफलक विविध नगरांना लावण्यास मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला

वरीलप्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. अध्यक्षा मा. पवार यमुनाताई रमणनाना यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
[ पवार यमुनाताई रमणनाना ]
अध्यक्षा
ब प्रभाग समिती, चिंचवड

प्रति,
सर्व संबंधित

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
ब प्रभाग समिती

क्र. एएमसी/बप्र२/कावि/३१८ /२०१३, दि. २७/११/२०१३.